**<u>नियमीत फौजदारी खटला क्र. ९९/२०१६</u>**

निशाणी क्र. ६८

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ३ यांचा शपथेवरील जबाब</u>**

मी याद्वारे सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो/करते की,

माझे नांव – राजेश गोविंद सावंत

माझे वय – ३५ वर्षे

व्यवसाय – किराणा दुकान

राहण्याचे ठिकाण – हनुमाननगर, पहिली गल्ली, सांगली

**<u>सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री. पखाली यांचेमार्फत</u>**

दि. १४.०७.२०१५ रोजी मी माझे आईवडिल व भाऊ असे सर्वजण हनुमाननगर, पहिली गल्ली, सांगली येथे राहावयास होतो. त्यादिवशी रात्री १०.०० वाजताचे सुमारास आमचे जेवण होवून मी व माझा भाऊ आमच्या खोलीत गेलो होतो. त्यावेळी बाहेरुन शिवीगाळ वगैरे आम्हाला ऐकू आली. त्यानंतर आईने आम्हाला हाका मारल्या. त्यामुळे प्रथम माझा भाऊ विजय हा बाहेर आला आणि त्याच्यानंतर मी आलो. त्यावेळेस आमचे शेजारी राहणारे बाळू कांबळे याचेसोबत वडिलांची वादावादी चालू होती. त्या वादावादीचे पर्यावसन हाणामारीत झाले व बाळू कांबळे याने काठीने वडिलांच्या डोक्यात मारले. त्यावेळी विजय हा वडिलांना सांभाळण्यासाठी गेला असता बाळू कांबळे याचा साडू सायबू केंगार याने विजयच्या हातावर काठीने मारले. ज्या काठीने मारहाण करण्यात आली त्या काठया मला दाखविलेस मी ओळखू शकतो. आता मला दाखविण्यात आलेल्या एकत्रीत आर्टिकल अ वरील काठया हया त्याच आहेत.

२. त्यावेळेस रेणुका केंगार, भिमा तांबे व आण्णाप्पा पारसे यांनी आईला धक्काबुक्की केली व तिला वडिलांकडे जावू दिले नाही. मी त्याठिकाणी जात असताना पार्वती हिने माझ्या तोंडावर मारले त्यामुळे माझा चश्मा खाली पडला आणि चश्मा शोधण्यासाठी जात असताना मी घसरुन पडलो. वडिलांच्या डोक्यात मार लागल्यामुळे त्यांच्या डोक्यातून रक्तस्त्राव होत होता. त्यामुळे आईने व भावाने वडिलांना शामसुंदर शर्मा यांच्या गाडी क्र. एमएच१०/५३५८ मधून सर्वप्रथम शासकिय रुग्णालयात नेले व तेथून पुढील उपचारासाठी

आदित्य हॉस्पीटल येथे नेले. आदित्य हॉस्पीटल येथे पोलिसांनी वडिलांचा जबाब नोंदविला होता. आरोपींविरुध्द माझ्या आईने फिर्याद दाखल केली होती. घटनेबाबत पोलिसांनी माझा जबाब नोंदविला होता. आरोपींना पाहिल्यास मी ओळखू शकतो. ते आजरोजी न्यायालयात हजर नाहीत. (आरोपींतर्फे हजेरी माफीचा अर्ज देण्यात आला आहे.) घटनेच्या वेळी वडिलांनी फुल टी शर्ट अथवा बनियन घातलेली होती व लुंगी घातलेली होती. आता मला दाखविण्यात आलेले एकत्रीत आर्टिकल ब वरील कपडे हे तेच आहेत.

## उलटतपास आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. वाय. बी. नाझरे

३. मला जन्मतः डोळयाचा दोष आहे. मला पूर्णवेळ दिसत नाही. हे म्हणणे खरे आहे की आमच्या शेजारी पाजारी इतर बरेच घरे आहेत. त्यामुळे शेजारी राहणाऱ्या लोकांकडे कामानिमित्त आमचे जाणे येणे असते. हे म्हणणे खरे आहे की आरोपी क्र. १, ३ व ५ हे आमच्या शेजारी राहावयास आहेत. हे म्हणणे खरे नाही की अनिल पसारे हे सांगलीवाडी येथे राहावयास होते. हे म्हणणे खरे नाही की आरोपी क्र. ३ व ६ हे मंगळवेढा येथे राहावयास होते. साक्षीदार स्वतःहून सांगतो की ते कामानिमित्त जावून येवून करत होते. हे म्हणणे खरे नाही की आरोपी क्र. ७ हा शामरावनगर, सांगली येथे वास्तव्यासाठी होते.

४. बाळू कांबळे यांस दारुचे व्यसन आहे व नशेमध्ये तो बऱ्याच वेळा बडबड करत होता व शिवीगाळ करत असतो. हे म्हणणे खरे आहे की त्या बडबडीचा माझ्या वडिलांना त्रास होत होता. त्यावरुन माझ्या वडिलांनी बाळू कांबळेच्या पत्नीसोबत बऱ्याच वेळा वाद घातला होता का हे मला सांगता येणार नाही. मी बाहेर असताना माझ्या वडिलांनी बाळू कांबळेला त्याच्या होणाऱ्या त्रासामुळे मारहाण केली होती का हे मला सांगता येणार नाही. घटनेच्या वेळेस आमचे एक दुकान, दोन खोल्या व एक संडास बाथरुम होते. गोपाळ सावंत व माझ्या वडिलांत वाटणीवरुन वाद होता. साक्षीदार पुन्हा सांगतो की तसा कोणताही वाद नव्हता.

५. हे म्हणणे खरे आहे की माझा सख्खा चुलत भाऊ प्रमोद हा दिव्यांग आहे. मला लांबचे दिसत नाही. मी घटना प्रत्यक्ष पाहिलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की भावानेदेखील घटना प्रत्यक्ष पाहिलेली नाही. पोलिसांना जबाब देतेवेळीस मी पोलिसांना पार्वती हिने माझ्या तोंडावर मारले व त्यामुळे माझा चश्मा खाली पडला असे सांगितले होते का हे आता माझ्या लक्षात नाही. सदरचा मजकूर पोलिसांनी माझ्या जबाबात का लिहिला

नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की पोलिसांनी माझा जबाब नोंदविता नव्हता.

६. आईने भावाला हाक मारली होती मी स्वतःहून बाहेर आलो. हे म्हणणे खरे नाही की घटना माझेसमक्ष घडली नाही त्यामुळे कोणतीही घटना घडली याबाबत मला माहिती नाही. घटनेच्या वेळेस लोक जमा झाले होते. हे म्हणणे खरे नाही की त्यामुळे कोणासोबत घटना घडली याबाबत मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की घटना घडली त्यावेळेस अंधार होता. घटना मी प्रत्यक्ष पाहिली नाही परंतु ऐकिव माहितीवर मी जबाब देत आहे. हे म्हणणे खरे नाही की माझ्या भावाने व वडिलांनी बाळू कांबळेला मारहाण केली होती. घटनेच्या वेळेस अंदाजे ५० लोक जमा झाले होते. आर्टिकल अ वरील काठया पोलिसांसमोर मी हजर केले असल्याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की आर्टिकल ब वरील कपडयापमाणे कपडे बाजारात सहजरित्या उपलब्ध होऊ शकतात. हे म्हणणे खरे आहे की आर्टिकल अ वरील काठयांप्रमाणे काठया बाजारात सहजरित्या उपलब्ध होऊ शकतात. हे म्हणणे खरे नाही की आरोपीच्या त्रासाला कंटाळून माझे वडिल आरोपीला मारायला गेले व आरोपींविरुध्द आम्ही खोटी फिर्याद दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की माझ्या सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की फिर्यादी पक्षाता मदत करण्यासाठी आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.
फेरतपास नाही.

साक्षीदाराचा जबाब माझेसमक्ष नोंदवणेत आला.
श्रवणोत्तर स्वीकृत

सही/-
( आर. पी. कुलकर्णी )
मुख्य न्यायदंडाधिकारी, सांगली

सांगली.
दिनांकः ०७.०३.२०२६